पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था, औरंगाबाद संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद-431111.

# समाजशास्त्र विभाग

# वार्षिक अहवाल

## शैक्षणिक वर्ष : 2020-2021

समिती प्रमुख
डॉ. मंजुषा नळगीरकर

प्राचार्य
डॉ. एस. आर. टकले

**श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री**

समाजशास्त्र विभाग

# वार्षिक अहवाल : 2020-2021

---

## व्हाट्सॲप ग्रुप आणि गूगल क्लासरूम ची निर्मिती

- कोविड -19 च्या प्रादुर्भावामुळे  जून व जुलै महिन्यात लॉकडाऊन असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून समाजशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांचे व्हाट्सअप ग्रुप आणि गूगल क्लासरूम तयार करण्यात आले. ज्याद्वारे त्यांना अभ्यासक्रमाची माहिती पाठविण्यात आली.
- बीए द्वितीय आणि तृतीय वर्ष समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांचे दिनांक 16 जून 2020 रोजी व्हाट्सअप ग्रुप तयार करण्यात आला. बीए प्रथम वर्षाचा व्हाट्सअप ग्रुप 10 सप्टेंबर 2020 ला तयार करण्यात आला.
- बीए द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचे दिनांक 17 जून 2020 रोजी गूगल क्लासरूम तयार करण्यात आले बीए प्रथम वर्षाचा गूगल क्लासरूम 11 सप्टेंबर 2020 रोजी तयार करण्यात आला.

## प्रथम सत्रात घेतलेल्या ऑनलाइन तासिकांचा अहवाल

- बीए प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना पाठविलेल्या व्हिडिओचा व घेतलेल्या ऑनलाइन ता सिकांचाअहवाल पुढीलप्रमाणे आहे.
- बीए द्वितीय वर्ष - अभ्यासक्रमाशी संबंधित मुद्द्यांवर एकूण 15 व्हीडिओ विद्यार्थ्यांना पाठविण्यात आले. शिकविलेल्या पाठ क्रमावर आधारित गुगल फॉर्म द्वारे 9 प्रश्नावली तयार करून विद्यार्थ्यांना सरावासाठी देण्यात आल्या. एकूण 65 ऑनलाईन तासिका घेण्यात आल्या.
- बी ए तृतीय वर्ष - अभ्यासक्रमाशी संबंधित मुद्द्यांवर एकूण 19 व्हिडिओ विद्यार्थ्यांना पाठविण्यात आले. शिकविलेल्या पाठ क्रमावर आधारित गुगल फॉर्म द्वारे 12 प्रश्नावली तयार करून विद्यार्थ्यांना सरावासाठी देण्यात आल्या. एकूण 66 ऑनलाइन तासिका घेण्यात आल्या.
- बी ए प्रथम वर्ष-  अभ्यासक्रमाशी संबंधित मुद्द्यांवर 4 व्हिडिओ पाठविण्यात आले. एकूण 60 ऑनलाईन तासिका घेण्यात आल्या.
- बी ए प्रथम द्वितीय व तृतीय वर्षाच्या ऑनलाइन तासिका 5 नोव्हेंबर ते 14 फेब्रुवारी 2021 या दरम्यान झाल्या आहेत.तर 15 फेब्रुवारी ते 13 मार्च यादरम्यान ऑफलाईन तासिका घेतल्या आहेत.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाणदिन विशेष व्याख्यान

- समाजशास्त्र विभागाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त ऑनलाइन विशेष व्याख्यानाचे आयोजन दिनांक 6 डिसेंबर 2020 रोजी करण्यात आले होते. या व्याख्यानास प्रमुख वक्ते म्हणून डॉ. गंगाधर मोरे (समाजशास्त्र विभाग प्रमुख व उपप्राचार्य, यशवंतराव चव्हाण कला महाविद्यालय सिल्लोड) हे लाभले होते. त्यांनी "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हिंदू कोड बिल विषयक विचार" या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले होते.

सदरील कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी भूषविले. ऑनलाईन व्याख्यान कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी (22) ऑनलाइन उपस्थित होते.

## ऑनलाइन  सामाजिक सर्वेक्षण

- समाजशास्त्र विभागाच्या वतीने जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात "लॉक डाऊन विषयी औरंगाबाद शहरातील नागरिकांच्या सामाजिक मानसिकतेचा अभ्यास" या विषयावर ऑनलाईन गुगल फॉर्म च्या माध्यमातून सर्वेक्षण करण्यात आले. त्या सर्वेक्षणाचा सविस्तर अहवाल लिहून त्यावरचा संशोधन पेपर रिसर्च जर्नलमध्ये प्रकाशित करण्यात आला.

## गटचर्चा

- समाजशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक 5 मार्च 2021 रोजी कोरोना महामारीचे समाजावर झालेले परिणाम या विषयावर गटचर्चेचे आयोजन करण्यात आले होते. सदरील गटचर्चेत सहा विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

## द्वितीय सत्रात घेतलेल्या ऑनलाइन तासिकांचा अहवाल

- बीए प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना पाठविलेल्या व्हिडिओचा व घेतलेल्या ऑनलाइन ता सिकांचाअहवाल पुढीलप्रमाणे आहे.
- बी ए प्रथम वर्ष-  अभ्यासक्रमाशी संबंधित मुद्द्यांवर 15 व्हिडिओ पाठविण्यात आले. एकूण 55 ऑनलाईन तासिका घेण्यात आल्या.शिकविलेल्या पाठ क्रमावर आधारित गुगल फॉर्म द्वारे 60 प्रश्नांची प्रश्नावली तयार करून विद्यार्थ्यांना सरावासाठी देण्यात आली.
- बी ए द्वितीय वर्ष - अभ्यासक्रमाशी संबंधित मुद्द्यांवर एकूण 15 व्हीडिओ विद्यार्थ्यांना पाठविण्यात आले. एकूण 56 ऑनलाईन तासिका घेण्यात आल्या.
- शिकविलेल्या पाठ क्रमावर आधारित गुगल फॉर्म द्वारे 60 प्रश्नांची प्रश्नावली तयार करून विद्यार्थ्यांना सरावासाठी देण्यात आली.
- बी ए तृतीय वर्ष - अभ्यासक्रमाशी संबंधित मुद्द्यांवर एकूण 16 व्हिडिओ विद्यार्थ्यांना पाठविण्यात आले.एकूण 110 ऑनलाइन तासिका घेण्यात आल्या. शिकविलेल्या पाठ क्रमावर आधारित गुगल फॉर्म द्वारे 60 प्रश्नांची प्रश्नावली तयार करून विद्यार्थ्यांना सरावासाठी देण्यात आली.

## ऑनलाइन अतिथी व्याख्यानमाला

- समाजशास्त्र विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी चार दिवसीय ऑनलाइन अतिथी व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते.
- दिनांक 5 जुलै 2021 रोजी **पहिले व्याख्यान** डॉ. मेघराज शिंदे (समाजशास्त्र विभाग प्रमुख जाधव कला व विज्ञान महाविद्यालय मेहकर) यांनी संघर्ष वादी सिद्धांत या विषयावर दिले.ज्यात त्यांनी संघर्षवादी संप्रदायाला वेगवेगळ्या विचारवंतांनी दिलेल्या योगदानाविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.सदरील व्याख्यानास समाजशास्त्र विषयाचे 20 विद्यार्थी ऑनलाइन उपस्थित होते.

- दिनांक 6 जुलै 2021 रोजी **दुसरे व्याख्यान** प्रा. राजू पोपळघट (समाजशास्त्र विभाग प्रमुख, राजर्षी शाहू कला व विज्ञान महाविद्यालय पाथ्री) यांनी प्रकल्प लेखन या विषयावर दिले.पोपळघट यांनी बी ए तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी प्रकल्प लेखन कसे करावे याविषयी परीपूर्ण माहिती दिली.सदरील व्याख्यानास समाजशास्त्र विषयाचे 16 विद्यार्थी ऑनलाइन उपस्थित होते.

- दिनांक 12 जुलै 2021 रोजी **तिसरे व्याख्यान** प्रा. अभय जायभाये (संचालक, राष्ट्रीय सेवा योजना कक्ष शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर तथा आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज नागठाणे,जिल्हा सातारा) यांनी बलुतेदारी व्यवस्था या विषयावर दिले. जायभाये यांनी ग्रामीण भागात पूर्वी अस्तित्वात असलेल्या बलुतेदारी व्यवस्थेचे स्वरूप आणि बारा बलुतेदारा मार्फत केल्या जाणाऱ्या कामा विषयीची सविस्तर माहिती दिली.सदरील व्याख्यानास समाजशास्त्र विषयाचे 14विद्यार्थी ऑनलाइन उपस्थित होते.
- दिनांक 13 जुलै 2019 रोजी चौथे व्याख्यान डॉ. जयश्री गायकवाड (अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना) यांनी दुर्बल घटकांच्या समस्या या विषयावर दिले. गायकवाड यांनी दुर्बल घटक म्हणजे काय आणि दुर्बल घटकांच्या कोणकोणत्या समस्या आहेत याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सदरील व्याख्यानास समाजशास्त्र विषयाचे 15 विद्यार्थी ऑनलाइन उपस्थित होते.

## कै. धुपाजी खोतकर पारितोषिक वितरण

- समाजशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक 17 जुलै 2021 रोजी शैक्षणिक वर्ष 2019- 20 मध्ये समाजशास्त्र मुख्य विषय घेऊन प्रथम आलेल्या कु. दिपाली सुधाकर बोलकर हिला कै. धुपाजी खोतकर पारितोषिक देण्यात आले. पारितोषिकाचे स्वरूप 500 रुपये व प्रमाणपत्र असे होते.सदरील पारितोषिकाचे वितरण मा ना. श्री हरिभाऊ बागडे (नाना) अध्यक्ष, पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था वरुड, यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे सचिव श्री श्याम सुंदर नाईक आणि विश्वस्थ डॉ. सर्जेराव ठोंबरे हे उपस्थित होते.

## सामंजस्य कराराअंतर्गत विशेष व्याख्यान

- समाजशास्त्र विभाग आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील समाजशास्त्र विभाग या दोन्ही विभागातील सामंजस्य कराराअंतर्गत दिनांक 24 ऑगस्ट 2021 रोजी विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.सदरील व्याख्यानास प्रमुख वक्ते म्हणून डॉ. पद्माकर सहारे (सहयोगी प्राध्यापक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद) हे लाभले होते.व्याख्यानाचा विषय होता **अनुसूची एक संशोधन तंत्र.** सरांनी अनुसूची म्हणजे काय, अनुसूची कशी तयार करायची व तिचा संशोधनामध्ये कसा उपयोग केला जातो याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. सदरील व्याख्यान कार्यक्रमास 35 विद्यार्थी ऑनलाइन उपस्थित होते.

## प्रकल्प सादरीकरण

- बी ए तृतीय वर्ष मुख्य समाजशास्त्र विषय असलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रकल्पाचे सादरीकरण दिनांक 20 ऑगस्ट 2021 रोजी झाले विद्यापीठाचे बाह्य परीक्षक म्हणून डॉ. गंगाधर मोरे (उपप्राचार्य व समाजशास्त्र विभाग प्रमुख यशवंतराव चव्हाण कला महाविद्यालय सिल्लोड) हे लाभले होते. समाजशास्त्र विषयाच्या 8 विद्यार्थ्यांनी आपल्या प्रकल्पाचे सादरीकरण केले.

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

## समाजशास्त्र विभाग

# कार्यक्रमाची छायाचित्रे : 2020-2021



























चौथे व्याख्यान डॉ. जयश्री गायकवाड, दुर्बल घटकांच्या समस्या या विषयावर देतांना



कु. दिपाली सुधाकर बोलकर हिला कै. धुपाजी खोतकर पारितोषिक देतांना मा ना. श्री हरिभाऊ बागडे (नाना), संस्थेचे सचिव श्री श्याम सुंदर नाईक आणि विश्वस्थ डॉ. सर्जेराव ठोंबरे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले


समाजशास्त्र विभाग
प्रकल्प सादरीकरण